**सन २०१९-२० या वित्तिय वर्षात रुग्णालयीन तत्त्वावर स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान वितरित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
शासन निर्णय क्रमांकः **कुनिका २०१९/प्र क्र ९३ /आरोग्य -५**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १७ सप्टेंबर,२०१९.

वाचा :-

1) **सार्वजनिक आरोग्य विभाग ,शासन निर्णय क्रमांकः, कुनिका २०११/प्र क्र ३२१/ आरोग्य-५, दिनांक २१ मार्च, २०१२**
2) **वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जुलै,२०१९**
3) **सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र क्र.संआसे /कुष्ठ व क्षय /कक्ष-१०२ /रुग्णालय तत्व प्रस्ताव/२४५५४-५६, दि.०८ जुलै,२०१९**

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक-१ येथील शासन निर्णयानुसार रुग्णालयीन तत्त्वावर कुष्ठरुग्णांसाठी रु.२२००/- प्रमाणे प्रतीरुग्ण दरमहा संस्थेने प्रत्यक्ष भरती केलेल्या रुग्णांप्रमाणे अनुदान देण्यात येते. संदर्भाधीन क्र.३ अन्वये प्राप्त प्रस्तावानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये रुग्णालयीन तत्वावर कुष्ठरुग्णांसाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रुग्णालयीन तत्वावर स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदाने देण्यासाठी ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली रु.३,००,००,०००/-(तीन कोटी) इतके सहायक अनुदान (योजनेतर) सन २०१९-२० या वर्षाकरिता अर्थसंकल्पित करण्यात आले आहे. सन २०१९-२० या वर्षाकरीता २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य उपशिर्ष (०१)(१२) कुष्ठरोग्यांसाठी सहायक अनुदाने (२२१००६८३) मूळ अनुदान रु.३,००,००,०००/-(तीन कोटी ) इतकी तरतूद आहे. वित्त विभागाच्या दि. ०८ जुलै,२०१९ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना चालू वित्तीय वर्षाच्या कालावधीसाठी निधी वितरणापैकी (डिसेंबर २०१९ अखेर) महसूली लेख्यातील ६० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सदंर्भाधीन क्र. ३ प्राप्त प्रस्तावानुसार खाली दर्शविल्याप्रमाणे स्वयंसेवी संस्थांना एकूण रु.१,३५,८९,९७९ /- ( रु.एक कोटी पस्तीस लाख एकोणनव्वद हजार नऊशे एकोणएंशी फक्त) इतके सहायक अनुदान दि.२१ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयातील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचेनाव | कालावधी | प्रत्यक्ष हजर रुग्ण | देय अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | महारोगी सेवा समिती, आनंदवन, वरोरा, जि.चंद्रपूर | ऑक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ | ३६०० | रु.७९,२०,०००/- |
| २ | महात्मा गांधी शिक्षण संस्था चावर्दा, जि.बुलढाणा | ऑक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ | ९० | रु.१,९८,०००/- |
| ३ | अहमदनगर जिल्हा कुष्ठरोग निवारण समिती, अहमदनगर | जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०१८ | २४९ | रु.५,३३,३६४/- |
| ४ | कुष्ठनिवारण दवाखाना, वडोली ता.तलासरी, जि.ठाणे | जुलै २०१८ ते मार्च २०१९ | ३५१ | रु.७,७२,२००/- |
| ५ | विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन, जि अमरावती | ऑक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ | ६०५ | रु.१३,०२,१४१/- |
| ६ | दि लेप्रसी मिशन कोठारा, लेप्रसी हॉस्पीटल ता अचलपूर जि अमरावती | ऑक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ | ४७६ | रु.४,५५,६९४/- |
| ७ | लेप्रसी रिलिफ रिहॅबेलेशन सेंटर निंभोरा जि अमरावती | ऑक्टोंबर २०१८ ते मार्च २०१९ | १०४ | रु.२,१८,९१०/- |
| ८ | रिचर्डसन ॲन्ड लेप्रसी हॉस्पीटल मिरज, सांगली | एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ | ८०१ | रु.७,३९,९५२/- |
| ९ | महारोगी सेवा समिती दत्तपूर वर्धा | एप्रिल २०१८ ते डिसेंबर, २०१८ | ५१० | रु.१०,८२,९७२/- |
| १० | एडलजी फ्रेमजी ऑल ब्लेस निरामय निकेतन, ट्रस्ट मुंबई | जुलै,२०१७ ते मार्च २०१९ | १७५ | रु.३,६६,७४६/- |
| | **एकूण** | | ६९६१ | रु.१,३५,८९,९७९ /- |

३. सन २०१९-२० या वित्तीय वर्षात रुग्णालयीन तत्त्वावर स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान वितरणाचा प्रस्ताव, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०१९ निधी वितरणाबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९ सोबतच्या परिशिष्टातील नमूद तपासणी सूचीनुसार तपासला असून सर्व अटींची पूर्तता होत आहे. तसेच सदर शासन परिपत्रकातील परिच्छेद १ ते १० मधील सर्व अटींची पूर्तता होत आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.८ जुलै, २०१९ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार, सन २०१९-२० या वितिय वर्षात रुग्णालयीन तत्त्वावर स्वयंसेवी संस्थांना यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरिक्षण /महालेखापाल यांचे गंभीर आक्षेप नाहीत. या योजनेंतर्गतचा निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होत नाही. सदर योजनेंतर्गत वस्तू खरेदी प्रस्तावात खरेदी

नियोजन करण्यात येते व आवश्यकतेनुसार दरकरारावर खरेदी करण्यात येते. तसेच भांडवली वस्तूंच्या खरेदीनंतर डेड स्टॉक रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येते. सदर योजनेच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

४. सहसंचालक (कुष्ठ व क्षय), पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यांनी वरील अटी पुर्ण केल्याची खातरजमा करुन संबंधित अनुदान अदा करण्याची कार्यवाही करावी. तसेच सदर अनुदानाशी संबंधित देयके अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे सादर करणेसाठी सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च करु नये व खर्चाचा ताळमेळ घालून अहवाल तसेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

५. याबाबतचा खर्च मागणी क्र.आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य उपशिर्ष (०१)(१२) कुष्ठरोग्यांसाठी सहायक अनुदाने (२२१००६८३), मुळ अनुदान या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू वित्तीय वर्षाच्या मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८ जुलै, २०१९ अन्वये त्या विभागाने प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१२५५४६३११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: CN = KIRAN VASANTRAO WAHUL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PHD
Date: 2019.09.18 15:12:18 +05'30'

**( किरण वाहुल )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखावअनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई.

२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

४) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

५) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

६) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठ व क्षय), पुणे
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
८) वित्तविभाग, (व्यय.१३) मंत्रालय, मुंबई.
९) सार्वजनिक आरोग्य विभाग, (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई/निवडनस्ती (आरोग्य-५).